महाराष्ट्र शासन
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला**
दूरध्वनी क्र.( ०७२४) २४३१९६०, २४३७०७८, फॅक्स क्र.२४३७०७८

जा.क्र.शावैमअ/आस्था-१,२/ ४४०७ /२०१८ दिनांक :29 /०५ /२०१८

## -: जाहिरात :-

विषयः- प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, संवर्गातील रिक्त असलेली पदे व भविष्यात रिक्त होणारी पदे कंत्राटी पध्दतीने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरणेबाबत

१. प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, संवर्गातील रिक्त असलेली पदे व भविष्यात रिक्त होणारी पदे कंत्राटी पध्दतीने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात १२० दिवसांकरीता तात्पूरत्या स्वरुपात भरण्यासाठी आवश्यक ती अर्हता / पात्रता धारक उमेदवाराकडुन विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

.२. प्राध्यापकांच्या सर्व पदासाठी दरमहा वेतन रु ५०,०००/- सहयोगी प्राध्यापक पदासाठी दरमहा वेतन रु ४०,०००/-

३. करारतत्वावरील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक ६५ वर्षे पर्यंत राहील.

४.सदरील सर्व पदाकरीता नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात १२० दिवसांकरीता अस्थाई स्वरुपात राहील व सदर पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नाकनिर्देशनाने भरली जाई पर्यंत/बदलीने उमेदवार उपलब्ध होई पर्यंत या पैकी जे आधी घडेल तो पर्यंत करण्यात येईल.

मुलाखतः- प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक पदासाठी दिनांक २५.०५.२०१८. मा. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, व सर्वोपचार रुग्णालय, अकोला यांचे कार्यालयात (अधिष्ठाता यांचे दालनात) सकाळी ११ वाजता सुरु होईल.

अर्जाचा नमूना :- शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या http://www.gmcakola.in या संकेतस्थळावर दि. १९/०५/२०१८ ते २४/०५/२०१८ रोजी पर्यंत उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

अर्ज स्विकृती :- दि.२४.०५.२०१८ रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यत.

अर्ज सादर करण्याबाबत.१.वरील प्रमाणे नमूद केलेल्या संकेतस्थळावर उपलब्ध अर्जाचा नमुना डाऊनलोड करुन सदर अर्ज संपुर्णपणे (विषयाच्या नावासह) व योग्य त-हेने भरुन दि. २४/०५/२०१८ रोजीपर्यंत कार्यालयीन वेळेत या महाविद्यालयात प्रत्यक्ष सादर करावेत.उशीरा आलेले/ अपुर्ण भरलेले/प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रति सोबत नसलेले/ संबंधित विषयाचे नांव नसलेले/अर्ज स्विकारले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

५.जे उमेदवार या अगोदरच या महाविद्यालयात/रुग्णालयात अथवा अन्यत्र शासकीय/खाजगी सेवेत असतील त्यांनी त्यांचे विहित नमुन्यातील भरलेले अर्ज त्यांच्या विभागामार्फत/ संस्थेमार्फतच संबंधीत विभागप्रमुखांच्या/ संस्थाप्रमुखांच्या नाहरकत प्रमाणपत्रासह या कार्यालयास अंतिम दिनांकापुर्वी सादर करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी परस्पर या कार्यालयास अर्ज सादर केल्यास त्याचा विचार केल्या जाणार नाही.

६.ज्या उमेदवारांनी हि जाहिरात प्रकाशीत होण्याअगोदर अर्ज केले असतील त्यांनी विहीत नमुन्यातील अर्ज अंतिम दिनांकापुर्वी या कार्यालयास आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रतिसह सादर करणे आवश्यक आहे.विहीत नमुन्यातील अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे.

७.उमेदवाराने विहीत नमुन्यातील अर्ज योग्य त-हेने व संपूर्ण भरल्यानंतर त्या सोबत पुढील कागदपत्रांच्या/प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत छायाप्रती सादर करणे आवश्यक आहे.

१.प्रथम, व्दितीय व तृतीय वर्ष एम.बी.बी.एस उत्त्तीर्ण गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्र.

२.पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण व गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्र.

३.प्रथम वर्ष, व्दितीय वर्ष, तृतीयवर्ष एम.बी.बी.एस. प्रयत्नांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. तसेंच एम.डी./एम.एस. चे प्रयत्न प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

४.जन्म तारखेचे प्रमाणपत्र/ माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्र

५.जातीचे प्रमाणपत्र व जातीचे वैधता प्रमाणपत्र ज्या संवर्गासाठी नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र आवश्यक आहे त्या संवर्गातल्या उमेदवारांना ते सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांचा विचार खुल्या प्रवर्गातील उमेदवार समजून केला जाईल याची उमेदवाराने नोंद घ्यावी.

६.अनुभवाचे प्रमाणपत्र.

७ .एम.एम.सी. रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (रजि.क्रमांक)

नियम व अटी

८ विभागीय निवड मंडळामार्फत नियुक्ती झालेल्या उमेदवारास शासनाच्या आदेशानुसार महाराष्ट्रात कोणत्याही महाविद्यालयात सेवा करणे बंधनकारक राहील.

९.उमेदवारास स्वखर्चाने दिलेल्या दिनांकास व वेळेत मुलाखतीस सर्व मुळ कागदपत्रांसह/प्रमाणपत्रांसह उपस्थित रहाणे आवश्यक राहील.

१०.या जाहिरातीमधील कोणताही मजकुरात उदा. अटि/शर्ती/नियम/आरक्षण/पदसंख्या/विभागीय निवड मंडळामार्फत निवड झालेल्या उमेदवारास नियुक्ती आदेश निर्गमीत करण्याचे अथवा प्रलंबीत ठेवण्याचे अथवा नियुक्ती रद्द करण्याचे/सदर जाहीरात रद्द करण्याचे अधिकार अधिष्ठातांनी राखून ठेवलेले आहेत अथवा एखादे पद भरण्याची किंवा रिक्त ठेवण्यांचे या बाबतचे अंतिम अधिकार अधिष्ठातांना असतील.

११.प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापकांची भविष्यात रिक्त होणारी पदे कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात भरण्याकरिता/ प्रतिक्षासुची तयार करण्याकरिता

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
अकोला.

प्रति,१)सुचना फलक
२)संबधित विषयाचे सर्व प्राध्यापक व विभागप्रमुख शावैम अकोला.
३)गंथपाल विभाग शावैम अकोला

प्रतः- माहितीस्तव सविनय सादर....
१)मा.सचिव वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग मंत्रालय,मुंबई-३२.
२)मा.संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई-०१